**"गॉज कापड, बॅण्डेज कापड, सतरंजी व बेडशीट"**
**या बाबीची दर निश्चितीबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक.उसं/भांखस/गॉज कापड, बॅण्डेज कापड, सतरंजी व बेडशीट/दरनिश्चिती/(५९)/ २०१७-१८/** B-8240 **दिनांक:-** 3 NOV 2017

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**
**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि. १३/१०/२०१७ चे इतिवृत्त**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार " **गॉज कापड, बॅण्डेज कापड, सतरंजी व बेडशीट** " या बाबीची सन २०१७-१८ या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी खालील संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.१३/१०/२०१७ रोजीच्या बैठकीत **"गॉज कापड, बॅण्डेज कापड, सतरंजी व बेडशीट"** या बाबीचे सन २०१६-१७ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर बाबीचे निश्चित केलेले दर परिशिष्ट **"अ"** येथील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

१) डॉ. मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, डॉ.बंदरवाला लेप्रसी हॉस्पीटल परिसर, येवले वाडी, कोंढवा बुद्रुक, पुणे.

२) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, श्री जगदंबा कुष्ठ निवास, "तपोवन", जिल्हा अमरावती.

" **गॉज कापड, बॅण्डेज कापड, सतरंजी व बेडशीट** " या बाबीचे दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाबीचे नाव व विर्निदेश | पॅकींगचा आकार | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १०० cm X२० m. | ३९०/- |
| २. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ९० cm X २० m. | ३५८/- |
| ३. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १००cm X १० m. | १९२/- |
| ४. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | १० cm X ४ m. | १५/- |
| ५. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs | १५ cm X ४ m. | २०/- |

| अ.क्र. | बाबीचे नाव व विर्निदेश | पॅकींगचा आकार | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| | and Cosmetics Act-१९४०) | | |
| ६. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ५० cm X १८ m. | १३०/- |
| ७. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ९० cm X १८ m. | २३७/- |
| ८. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १०० cm X १० m | १२०/- |
| ९. | बेडशिट क्लॉथ (वार्प २०, वेप्ट ४०, ग्रॅम १७५) **(डॉ.मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित,या संस्थेसाठी आरक्षित फक्त)** | ५४ इंच प्रती मिटर | ६५/- |
| १०. | सतरंजी- अ) ६ नं सुताची १ ft X १ ft<br>ब) २ नं सुताची १ ft X १ ft<br>**(विदर्भ महारोगी सेवा मंडळ, या संस्थेसाठी आरक्षित फक्त)** | | १६/-<br>११/- |

संस्थेस राखीव असलेल्या बाबींची वार्षिक उत्पादन क्षमता खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | उत्पादित वस्तुंचे नांव | डॉ. मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, पुणे. | विदर्भ महारोगी सेवा मंडळ, अमरावती. |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | बॅन्डेज कापड | ०५.४० लाख मिटर | ०४.०० लाख मिटर |
| २. | गॉज क्लॉथ | १०.८० लाख मिटर | ०३.०० लाख मिटर |
| ३. | बेडशिट क्लॉथ | ०१.२० लाख मिटर | ----- |
| ४. | सतरंजी | ----- | २०,००० चौ. फुट |

संस्थेने उपरोक्त नमुद बाबींचा उत्पादन क्षमतेच्या मर्यादेत पुरवठा करावा. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई या विभागांनी उपरोक्त संस्थेस उत्पादन क्षमतेच्या प्रमाणात पुरवठा आदेश विभागून देण्याबाबत कार्यवाही करावी.

सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता दि. ३०/०४/२०१८ पर्यंत ग्राहय राहील. सदरचे दर सर्व कर समाविष्टित असून त्यात वस्तू व सेवा कराचा (GST) समावेश आहे. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

शासनाच्या आरक्षित संस्थांनी संस्थेच्या अंध व अपंग सभासद व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावे.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत मालाचा पुरवठा करणे

आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी:-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच कार्यादेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ०५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाचा / वस्तूचा दर्जा व गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

सदर संस्थांनी शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठयाबाबतचा अहवाल वस्तूनिहाय दरमहा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) डॉ. मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, डॉ.बंदरवाला लेप्रसी हॉस्पीटल परिसर,येवले वाडी, कोढवा बुद्रुक, पुणे.
२) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, श्री जगदंबा कुष्ट निवास, "तपोवन", जिल्हा अमरावती.
३) निवड नस्ती.